ePaper

महायुती उमेदवाराच्या प्रचारासाठी मोदींची कोल्हापुरात 28 एप्रिलला सभा




|| वर्ष - 7 | अंक - 334 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- गुकेशला ऐतिहासिक जेतेपद!
- रणवीर सिंगची पोलिसांत धाव
- आमच्याकडेही बोलण्यासारखं खूप आहे!
- मोदींविरोधात काँग्रेस आक्रमक!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 23 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अजित दादांनी सत्तेत जाण्यासाठी कुटुंबाला सोडले!

## लोकसभेनंतर त्यांचा निकाल झिरो, आमदार रोहित पवार यांचे भाकीत

| इंदापूर | महाईन्यूज

**लोकसभा झाल्यानंतर अजित दादांचा पक्ष राहील का? असा प्रश्न आता सामान्य जनतेला पडला आहे. कारण लोकसभेचे ९ तिकीट त्यांना मिळणार होते. ९ पैकी ४ जागा मिळाल्या ४ पैकी २ नातेवाईक आहेत. एक इम्पोर्ट केलेला नेता त्यांना उभा करावा लागला. लोकसभेनंतर त्यांचा शून्य निकाल लागणार असल्याचे भाकीत आमदार रोहित पवार यांनी केले. आमदार रोहित पवार आज इंदापूर दौऱ्यावर आहेत यावेळी त्यांनी माध्यमांची संवाद साधला.**



रोहित पवार म्हणाले की, लोकसभेच्या निकालानंतर त्यांच्याबरोबर आज जे लोक आहेत. त्यांच्याबरोबर जे काम करत आहेत. ते त्यांच्याबरोबर न राहता चार-पाच आमदारांसह १२ जण भाजप बरोबर जाणार आहेत. तर २१,२२ लोक हे साहेबांच्या चर्चेत आहेत. याबाबत अभ्यास करून साहेब निर्णय घेतील. काही भाजपमध्ये आणि काही आमच्याबरोबर आले तर त्यांच्याकडे किती राहतील त्यामुळे आमदारकीचा प्रश्नच उरत नाही.

राष्ट्रवादीतून फुटून बाहेर पडलेला लोकांना पुन्हा सोबत घेणार का? असा प्रश्न केला तर रोहित पवार म्हणाले की, पदाधिकाऱ्यांना १००% माघारी घेणार नाही. मात्र काही आमदारांना मुद्दामहून काही व्यक्तिगत अडचणी आणून तिकडे घेतले गेले होते. मात्र ते आमदार सुरुवातीपासून साहेबांबरोबर संपर्कात आहेत. ते आमदार तिकडे गेल्यापासून त्यांनी कधीही साहेबां विरोधात किंवा पक्षाविरोधात एकही वक्तव्य केलेले नाही, असेही पवार यावेळी म्हणाले. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराच्या शुभारंभ निमित्त बारामतीतील आयोजित सभेत मंगलदास बांदल यांनी शरद पवारांवर केलेल्या टीकेबाबत रोहित पवार यांना विचारले असता ते म्हणाले की, पूर्वीचे दादा जे आम्हाला माहित आहेत.

### भाड्याने आणलेल्या व्यक्तीला सोडणार नाही...

»अजितदादा स्टेजवर असतानाही एखादी व्यक्ती पवार साहेबांच्या विरोधात बोलत असताना दादा काहीच म्हणत नसतील. तर अशा भाड्याने आणलेल्या व्यक्तीला आम्ही लोकशाहीच्या मार्गाने सोडणार नाही, असे म्हणत त्यांनी नाव न घेता मंगलदास बांदल यांना इशारा दिला.

### सत्तेत जाण्यासाठी कुटुंबाला सोडले....

»इंदापूर तालुक्यात दुष्काळ पडलेला असताना अजित पवार वारंवार इंदापूर मध्ये येऊन ही ते दुष्काळाबाबत बोलत नाहीत. याबाबत प्रश्न विचारला असता रोहित पवार म्हणाले की, कदाचित ते विसरून गेले असतील की, आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहोत. सत्तेत आहोत. सत्तेत जाण्यासाठी त्यांनी खटाटोप केला. कुटुंबाला सोडले. आज त्यांना या गोष्टी आठवत नाही. आज सामान्य माणस अडचणीत आहेत. हे कोणाला दिसत नाही. आम्ही वारंवार हे प्रश्न शासन दरबारी मांडत आहोत. मात्र वरूनच निर्णय न झाल्यामुळे अधिकाऱ्यांनाही काहीच करता येत नाही. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आता चारा डेपो सुरू होणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही.

# ताथवडे परिसरात सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराचा झंझावात!

## » बारामती लोकसभा रणसंग्राम : महायुतीच्या प्रचाराला नागरिकांचा प्रतिसाद

| पिंपरी | महाईन्यूज |



बारामती लोकसभा मतदारसंघाच्या भोर राजगड मुळशी विधानसभा मतदारसंघातील पिंपरी चिंचवड शहरातील ताथवडे गावात तमाम ज्येष्ठ, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून केलेले स्वागत, “घड्याळा”च्या मताधिक्याचा गजर करून महायुतीच्या पाठीशी एकवटलेली ताकद विशेष बळ देणारी ठरली, अशा भावना महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केल्या आहेत. बारामती लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांनी ताथवडे आणि परिसरात प्रचार दौरा केला. त्याला स्थानिक महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सुरेखा पवार, पूजा पवार,ववंदना पवार, कल्पना पवार, बेबीताई शिंदे, गौरी पवार, चित्रा पवार, प्राजक्ता पवार, सुप्रिया पवार यांच्यासह उपस्थित महिलांनी माझे औक्षण करून स्वागत केले. प्रास्ताविकात बोलताना युवा नेते संदीप पवार यांनी अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शहराचा विकास कशा पद्धतीने नियोजनबद्ध झाला त्याची माहिती देऊन त्यांच्याच नेतृत्वाखाली महायुतीच्या माध्यमातून विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यासाठी महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी ताथवडेतील सर्व ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, परिसरातील नागरिकांसह माजी नगरसेवक मयूर कलाटे मोरेश्वर भोंडवे, संतोष बारणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अंकुश मोरे, पिडीसिसी बँकेचे व्हा. चेअरमन सुनील चांदेरे, राजाभाऊ हगवणे, राष्ट्रवादीच्या महिला आघाडी अध्यक्षा मोनिका हरगुडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष अजित पवार, राजेंद्र पवार, मारुतीराया पवार, सुखदेव पवार, राजाराम पवार, रामदास पवार, सुभद्रा पवार, अर्पिता पवार, रूपाली पवारझोपडपट्टी सुरक्षा दलाचे अध्यक्ष भगवानराव वैराट, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष महेश शिंदे, राष्ट्रवादी सोसायटी कनेक्ट अभियानाचे समन्वयक योगेंद्र गायकवाड, यांच्यासह विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### “यु आर वन ऑफ द बेस्ट डॉटर इन लॉ”

» “यु आर वन ऑफ द बेस्ट डॉटर इन लॉ”... एव्हढी रात्र झाली अजून कशी उपाशी? जेवन करुनच जा...” असा वडीलकीचा आग्रह माजी खासदार नानासाहेब नवले यांनी केला. त्याला विनम्रपणे प्रतिसाद देत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी ताथवडेकरांचा पाहुणचार आपुलकीने स्वीकारला. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, काही दिवसांपूर्वीच संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, चेअरमन, माजी खासदार, ज्येष्ठ नेते नानासाहेब नवले यांची पुणे येथील निवासस्थानी भेट घेतली होती. त्या भेटीत त्यांनी आशीर्वाद, पाठिंबा दिला होता. काल मी त्यांच्या ताथवडे गावात प्रचारासाठी येणार असल्याचे समजताच ते ताथवडेत आले होते. त्यामुळे त्यांची पुन्हा एकदा भेट घेतली.

# ज्येष्ठांचा सन्मान हीच आमची संस्कृती!

## मुरलीधर मोहोळ: 190 ज्येष्ठ नागरीक संघांचा मोहोळ यांना पाठिंबा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या वडिलांनी दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी श्रीरामांनी आपल्या राज्याचा चौदा वर्ष त्याग केला. माता शबरीची उष्टी बोरं खावून तिचा सन्मान केला. ज्येष्ठांचा आदर, सन्मान करा हाच धडा रामायणातून आपल्याला मिळतो. त्यामुळेच ज्येष्ठांचा सन्मान हीच आमची संस्कृती आहे. पुण्यातील ज्येष्ठ, वडिलधारे हेच माझे स्टार प्रचारक आहेत आणि त्यांच्यासाठी असणाऱ्या मोदी सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करु, असे महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.**



ऑस्कॉप, फेसकॉम, भाजप ज्येष्ठ नागरिक आघाडी आणि पुणे शहरातील सर्व १९० अंगीकृत ज्येष्ठ नागरिक संघांनी मोहोळ यांना पाठिंबा जाहीर केला. या ज्येष्ठ नागरिक मेळाव्यात मोहोळ बोलत होते. ज्येष्ठ नागरिकांच्या ऑस्कॉप संघटनेचे अध्यक्ष दिलीप पवार, कार्याध्यक्ष श्रीराम बेडकीहाळ, कोषाध्यक्ष अच्युत कुलकर्णी, सचिव ऊर्मिला शेजवलकर, तसेच उदय रेणूकर, अरुण रोडे, राजीव कुलकर्णी या पदाधिकाऱ्यांनी मेळावा आयोजनात मोलाची भूमिका बजावली. हेल्पेज इंडिया संघटनेचे वसंतराव दापोरकर, बंडोपंत फडके, अनिल कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, सुरेखा पेंडसे, ऊषा जोईल, श्रद्धा चिटणीस आदीही उपस्थित होते.

आपल्या घरातील ज्येष्ठ किंवा वडिलधारे आपली ताकद असते असे सांगून मोहोळ म्हणाले, 'आपल्याला कधी ना कधी तरी निराशा येते. त्यावेळी घरातील ज्येष्ठांशी संवाद साधल्यानंतर आपले नैराश्य दूर होते, हा माझा अनुभव आहे. अनेकदा मला गोंधळलेल्या मनस्थीतीत मला ज्येष्ठांच्या मार्गदर्शनातून त्यातून बाहेर पडणे शक्य झाले आहे. हे मी माझे अनुभव सांगतोय. भाजपने कायमच ज्येष्ठ नागरीकांची दखल घेतली आहे. कारण ज्येष्ठ नागरीक हे समाजातील अनुभवाची भांडारे आहेत. ज्येष्ठ, वडिलधारे माझ्यासाठी कायमच आदरणीय राहिले आहेत, पुढही रहातील. कोरोना काळात ज्येष्ठांची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले, त्यांच्या त्या आशिर्वादानेच मला या निवडणुकीत संधी मिळाली. त्यांचा आशीर्वाद माझ्यासाठी मोठा आहे. सर्वांशी कायमच गप्पा मारणारे, बोलणारे ज्येष्ठ नागरीक हेच खरे माझे स्टार प्रचारक आहेत.'

### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

यावेळी पुणे शहरातील बहुसंख्य ज्येष्ठ नागरिक पदाधिकाऱ्यांसह राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, महायुती समन्वयक संदीप खर्डेकर, शहर सरचिटणीस पुनीत जोशी, शिवसेनेचे उपशहरप्रमुख सचिन थोरात, महायुतीचे समन्वयक शाम देशपांडे, ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे समन्वयक बाळासाहेब टेमकर, कोथरूड दक्षिण मंडलचे अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, कोथरूड उत्तर मंडलचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, माजी नगरसेविका उर्मिला आपटे, माजी उपमहापौर नाना नाशिककर, अनुपमा लिमये, कोथरूड सरचिटणीस अनुराधा येडके, मंजूश्री खर्डेकर, मनसे विभाग अध्यक्ष सुधीर धावडे, रिपाइंचे कोथरूड अध्यक्ष बाळासाहेब खंकाळ, शिवसेनेचे कोथरूड विभाग प्रमुख मयूर पानसरे, दीपक पवार, गिरीश खत्री, शहर चिटणीस प्रशांत हरसुले, राहुल कोकाटे, कोथरूड उपाध्यक्ष दिनेश माझिरे, अजित जगताप आदी उपस्थित होते.

## कणखर आढळराव पाटील झाले भावुक..!

## लहानग्या यश ने आढळरावांना दिल्या शुभेच्छा..!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काळ सक्रिय राजकारणात असणारे त्याचबरोबर एक नव्हे दोन नव्हे तब्बल तीन वेळा लोकसभेचे खासदार म्हणून जनतेने निवडून दिलेले कणखर व कट्टर नेतृत्व म्हणून शिवाजी आढळराव पाटील यांना महाराष्ट्र ओळखतो. त्याच जोरावर ते यंदाची शिरूर लोकसभेची निवडणूक पुन्हा लढवत आहेत.**




एक अभ्यासू, कणखर, आक्रमक, कृतिशील खासदार म्हणून शिवाजी आढळराव पाटील यांनी आजवर काम केले आहे, त्यातच नुकतेच निवडणूक प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने लौकी येथे देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान स्व. सुधीर पंढरीनाथ थोरात यांचा चिरंजीव कु. यश सुधीर थोरात या चिमुकल्याने आढळराव पाटील यांना लेखी पत्राद्वारे दिलेल्या शुभेच्छांनी कणखर मनाचे आढळराव देखील भावुक झाले..

यावेळी 'शिवाजीदादा खरच मोठ्या भावाप्रमाणे माझ्या मागे उभे राहिले, माझ्यावर माझ्या कुटुंबावर ज्यावेळी वेळ होती त्या वेळी मला भावासारखा आधार दिला हे मी कधी विसरू शकत नाही अशी भावना वीर माता सौ. कौसल्या पंढरीनाथ थोरात यांनी व्यक्त केली. यावेळी उपस्थितांसह शिवाजीराव आढळराव पाटील भावनिक झाले. जनतेचं हे प्रेम व आपुलकी पाहून मन गहिवरून आले, माझ्या जनतेचे हेच प्रेम आणि आशीर्वाद मला नेहमी लढण्याची ऊर्जा देत राहते. यापुढे यशच्या सर्व शिक्षणाची जबाबदारी माझी असा शब्द त्यांनी यावेळी वीरमाता कौसल्या थोरात यांना दिला.

### यशचे भावनिक पत्र

मा. श्री. शिवाजीदादा आढळराव पाटील
शहिद जवान माझे पप्पा स्व. सुधीरजी पंढरीनाथ थोरात, देशाचे रक्षण करत असताना त्यांना वीरमरण आले. आपण एक कुटुंबप्रमुख म्हणून तुम्ही आमच्या सोबत राहिलात आपले आम्ही खूप खूप आभारी आहोत, तुम्हाला जनतेची सेवा करण्याची पुन्हा संधी मिळो.
वंदे मातरम
BEST OF LUCK आजोबा..!

## बारामतीमध्ये 'तुतारी' चिन्हावरून वाद, अपक्ष उमेदवाराला तुतारी चिन्ह



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना सोमवारी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये सोयल शहा युनूस शहा शेख या अपक्ष उमेदवाराला 'तुतारी' हे चिन्ह देण्यात आले. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आक्षेप घेण्यात आला आणि थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

बारामती मतदारसंघासाठी १२ ते १९ एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. या कालावधीत ५१ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या अर्जांची छाननी २० एप्रिल रोजी झाली. छाननीमध्ये पाच अर्ज बाद होऊन ४६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले. त्यानंतर सोमवारी (२२ एप्रिल) दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत होती. त्यामध्ये आठ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे या मतदारसंघात ३८ उमेदवार निवडणूक रिंगणात असणार आहेत. उमेदवारांची संख्या निश्चित झाल्याने अपक्ष उमेदवारांना मतदानासाठी चिन्हांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये शेख यांनी पसंतीमध्ये 'तुतारी' या चिन्हाची मागणी केली होती. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून हे चिन्ह शेख यांना देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चिन्ह 'तुतारी फुंकणारा माणूस' असे आहे.

# श्रीरंग बारणे अब्जाधिश!

## 60व्या वर्षी दिली दहावीची परीक्षा, निवडणूक अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून संपत्ती समोर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे मावळचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे अब्जाधीश आहेत. १३२ कोटी २३ लाख ९१ हजार ६३१ रुपयांची त्यांची मालमत्ता असून, पाच वर्षांत २९ कोटी ४२ लाख ८१ हजार ४९७ रुपयांनी मालमत्तेत वाढ झाली आहे. निवडणूक अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांची संपत्ती समोर आली .**



मागील लोकसभा निवडणुकीवेळी २०१९ ला उमेदवारी अर्ज दाखल करताना बारणे कुटुंबाने १०२ कोटी ८१ लाख १० हजार रुपयांची मालमत्ता दाखविली होती. त्यात बारणे यांची ८३ कोटी १७ लाख ४६ हजार, तर पत्नी सरिता यांची १९ कोटी ६३ लाखांची मालमत्ता होती. आता २०२४ मध्ये बारणे कुटुंबीयांची एकूण संपत्ती १३२ कोटी २४ लाखांवर पोहोचली. त्यात बारणे यांची एकट्याची जंगम आणि स्थावर अशी १०६ कोटी ५५ लाखांची, तर पत्नी सरिता यांची २५ कोटी ६८ लाखांची मालमत्ता आहे. बारणे यांच्याकडे २६ लाख, तर पत्नीकडे १२ लाख रोख रक्कम आहे. शेती, बांधकाम व्यावसायिक आणि वीट कारखानदारी हे बारणे यांचे व्यवसाय आहेत. त्यांच्या विविध बँकांमध्ये मुदत, बचत ठेवी, शेअर्स, विमापत्रे, भागभांडवल आहेत. सहा जणांना त्यांनी कर्ज दिले आहे.

बारणे यांच्याकडे मर्सिडीझ बेंझ आणि टोयाटो फॉर्च्युनर या दोन मोटारी आहेत. त्यांच्याकडे हिऱ्याची ११ लाख ५५ हजारांची एक अंगठी, तर ३२ लाख ५० हजारांचे ४७० ग्रॅम सोने आहे.

३५ हजारांचे एक वेब्ली अँड स्कॉट बनावटीचे रिव्हॉल्व्हरही आहे. तर पत्नी सरिता यांच्याकडे पाच लाख ५० हजारांच्या कर्णकुड्या, ५१ लाखांचे ७४३ ग्रॅम सोने आहे. बारणे यांच्यावर ४४ लाखांचे वाहन आणि वेगवेगळ्या संस्थांचे ४१ लाख असे एकूण ८५ लाखांचे कर्ज आहे.

**जंगम मालमत्ता**

१५ कोटी ८२ लाख १० हजार

**स्थावर मालमत्ता**

९० कोटी ७३ लाख ३९ हजार

**एकूण**

१०६ कोटी ५५ लाख ५० हजार रुपये

### मावळ, मुळशीत जमीन

» खासदार बारणे यांची मावळ तालुक्यातील पाचाणे येथे तीन ठिकाणी, मुळशी तालुक्यातील मारुंजी, माणमध्ये शेतजमीन आहे. तर ताथवडे, चऱ्होलीसह, थेरगावामध्ये पाच ठिकाणी बिगरशेतजमीन असून, थेरगावमध्ये चार वाणिज्यिक, तीन निवासी इमारती आहेत.

### सन 2022 मध्ये दहावी उत्तीर्ण

» खासदार बारणे हे ६० वर्षांचे असून, मार्च २०२२ मध्ये दहावीची परीक्षा देऊन ते उत्तीर्ण झाले आहेत. चिंचवड येथील श्री फत्तेचंद जैन विद्यालय येथून त्यांनी दहावीची परीक्षा दिली असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.

### पत्नी सरिता बारणे यांची संपत्ती

» १ कोटी १८ लाख ६६ हजार स्थावर मालमत्ता

२४ कोटी ३७ लाख ७४ हजार रुपये

**एकूण**

२५ कोटी ६८ लाख ४१ हजार रुपये

१३२ कोटी २३ लाख ९१ हजार ६३१ रुपये

पाच वर्षांत वाढलेली संपत्ती

२९ कोटी ४२ लाख ८१ हजार ४९७ रुपये

---

# पुण्यात ओला, उबर सुरू राहणार?

## राज्य परिवहन अपिलीय लवादासमोर सुनावणी, 18 जूनला अंतिम सुनावणी

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या परवाना नाकारण्याच्या ऑनलाइन प्रवासी वाहतूक क्षेत्रातील ओला आणि उबर या कंपन्यांना आव्हान दिले आहे. यावर राज्य परिवहन अपिलीय लवादासमोर सोमवारी सुनावणी झाली. दोन्ही कंपन्यांना आणि प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) लवादासमोर म्हणणे मांडले असून, यावर १८ जूनला अंतिम सुनावणी होणार आहे.**

राज्य सरकारचे मोटार वाहन समुच्चयक (ॲग्रीगेटर) धोरण नसल्याने केंद्र सरकारच्या मोटार वाहन समुच्चय धोरणांतर्गत ॲनी टेक्नॉलॉजीज (ओला) आणि उबर इंडिया सिस्टीम्स या कंपन्यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) अर्ज केले होते. हे अर्ज पुनर्विलोकनासाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणासमोर ११ मार्चला ठेवण्यात आले होते. जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ओला आणि उबरचे परवान्याचे अर्ज नामंजूर करण्यात आले. ओला आणि उबर या कंपन्यांना राज्य परिवहन अपिलीय लवादासमोर या निर्णयाला आव्हान देण्यास एक महिन्याचा कालावधी होता. सुरुवातीला ओलाने लवादासमोर या निर्णयाला आव्हान दिले. त्यानंतर मुदत संपत असताना उबरनेही या निर्णयाच्या विरोधात लवादाकडे धाव घेतली. या दोन्ही कंपन्यांच्या अर्जावर सोमवारी सुनावणी झाली. राज्य सरकारचे वाहन समुच्चयक धोरण नसल्याने आपल्यावर कारवाई करू नये, असे म्हणणे कंपन्यांनी मांडले. यावर आरटीओनेही भूमिका मांडली. या प्रकरणी अंतिम सुनावणी १८ जूनला होणार आहे.




### नेमकी पार्श्वभूमी काय?

**» प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने वातानुकूलित टॅक्सीच्या भाडेदरात पहिल्या दीड किलोमीटरसाठी ३७ रुपये आणि पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २५ रुपये वाढ केली. मात्र ओला आणि उबर या कंपन्यांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही तोडगा निघाला नाही. त्याबाबत झालेल्या अनेक बैठका निष्फळ ठरल्या. अखेर या कंपन्यांचे परवान्याचे अर्ज नामंजूर करण्याचे पाऊल जिल्हाधिकाऱ्यांनी उचलले.**

> ओला आणि उबरने राज्य परिवहन अपिलीय लवादासमोर आपली बाजू मांडली आहे. यावरही आरटीओकडून बाजू मांडण्यात आली आहे. उबरने उशिरा लवादासमोर अर्ज केल्याने यावर आरटीओला म्हणणे मांडण्याचे निर्देश लवादाने दिले आहेत.
>
> **-संजीव भोर,** प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी

---

### पिस्तूल व जिवंत काडतुसासह तरुणाला अटक

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

पिस्तूल व जिवंत काडतुसासह एका २० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई रविवारी (दि.२१) थेरगाव येथे वाकड पोलिसांनी केली आहे. बॉन्ड उर्फ रोहित राहूल शिंदे (वय २० रा. रहाटणी) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई अजय फल्ले यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा त्याच्याकडे अवैधरित्या २५ हजार रुपयांचे पिस्तूल व २ हजार रुपयांचे जिवंत काडतुस असा एकूण २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. यावरून वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विठ्ठल साळुंखे, पोलीस उपनिरिक्षक सचिन चव्हाण, अनिरुध्द सावर्डे, बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, सहायक पोलीस फौजदार राजेंद्र काळे, पोलीस हवालदार वंदु गिरे, अतिश जाधव, अतिक शेख, विक्रांत चव्हाण, पोलीस नाईक प्रशांत गिलबीले, रामचंद्र तळपे, पोलीस शिपाई विनायक घार्गे, अजय फल्ले, सौदागर लामतुरे, कौंतेय खराडे, रमेश खेडकर, ज्ञानदेव झेंडे यांनी केली .



## भूमिका

# आचारसंहिता : रोखठोक तरीही मानवी!

**केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीची घोषणा केली त्या दिवसापासून देशभर निवडणुकांसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाली. आदर्श आचारसंहितेचे अंतिम ध्येय मतदारांनी निर्भयपणे आणि कोणत्याही दबावास बळी न पडता मतदानाचा अधिकार बजावावा हेच आहे.**

'या भूमिकेला अनुसरून नवी लोकसभा अस्तित्वात आल्यावर आदर्श आचारसंहितेचा कालावधी समाप्त होईल. आचारसंहितेच्या तरतुदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसाहाय्यित संस्थांना करावी लागते. आदर्श आचारसंहितेमधील सर्वसामान्य तरतुदी सर्वांनाच लागू होतात आणि त्यामध्ये निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांचाही समावेश होतो.

आदर्श आचारसंहितेनुसार संबंधित यंत्रणेची योग्य पद्धतीने आगाऊ परवानगी घेऊन निवडणूक प्रचाराचे सर्व कार्यक्रम करणे राजकीय पक्षांवर आणि उमेदवारांवर बंधनकारक आहे. प्रचार मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होणे अपेक्षित नाही. प्रचाराची किंवा मिरवणुकीची परवानगी म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळा आणण्याची परवानगी नव्हे! सर्व राजकीय पक्षांना निवडणूकविषयक सभांसाठी मैदाने आणि आवश्यकता असल्यास हेलिपॅडची सुविधा सारख्या प्रमाणात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणत्याही पक्षाला अथवा



उमेदवारासाठी झुकते माप देणे अपेक्षित नाही. आचारसंहितेच्या कालावधीत सरकारी खर्चाने शासकीय योजनांची जाहिरात करता येत नाही. सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना निवडणूक प्रचाराचे काम आणि शासकीय कामकाज यांची सरमिसळ करता येत नाही. सरकारी कामकाजासाठी जनतेचा पैसा वापरला जातो आणि म्हणून सरकारी खर्चातून स्वत:ची, स्वत:च्या पक्षाची प्रसिद्धी करणे उचित नाही. तो आचारसंहितेचा भंग ठरतो.

आचारसंहितेच्या काळात सरकारतर्फे राबविण्याच्या नव्या प्रकल्पांची अथवा कार्यक्रमांची घोषणा करता येत नाही. कुठल्याही प्रकारचे आर्थिक अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता येत नाही. पायाभरणी समारंभांसारखे कार्यक्रम आचारसंहितेच्या काळात करता येत नाहीत. सत्तारूढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पडू शकेल अशा गोष्टी प्रतिबंधित आहेत. यंत्रणेमार्फत आणि राजकीय सहभाग न घेता अत्यावश्यक कामे मात्र हाती घेता येतील. या तरतुदींमागील उद्दिष्ट लक्षात घेतले पाहिजे. निवडणूक काळात सरकारी यंत्रणा एखाद्या पक्षाच्या दावणीला बांधणे आचारसंहितेला अभिप्रेत नाही. तरी, पूर्णतेच्या टप्प्यावर असलेल्या सार्वजनिक हिताच्या बाबी वापरात आणण्यासाठी आचारसंहितेमुळे विलंब होऊ नये अशी निवडणूक आयोगाची भूमिका आहे.

आचारसंहितेच्या कालावधीत शासनाच्या नव्या योजनांना मान्यता देणे आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी लाभार्थीकेंद्री योजनांचा आढावा घेणे आचारसंहितेचे उल्लंघन ठरते. अशा योजना पूर्वीपासून चालू असल्या तरी हे बंधन लागू आहे. कल्याणकारी योजनांसाठी निधी आणि शासकीय कामांची कंत्राटे देता येणार नाही. त्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल. खासदार आणि आमदार इत्यादींचे त्यांच्या निधीमधून घेण्यात आलेल्या वाहनांवरील नाव झाकणे अपेक्षित आहे. अन्यथा तो संबंधित लोकप्रतिनिधीचा निवडणूक प्रचार मानला जातो. असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये गणला जातो. यंदा लोकसभेच्या मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ९५ लाख रुपये आहे.

आचारसंहितेबद्दलचे निर्देश केवळ निवडणूक आयोग देऊ शकतो. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोगाचे प्रतिनिधित्व करत असते. राज्यभरात आयोगाच्या वतीने निवडणूक संचालित करण्याचे काम पाहात असते. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सरकारकडून आयोगाकडे पाठविण्याचे सर्व संदर्भ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जावे लागतात. काही प्रकारची कामे संबंधित शासकीय यंत्रणा आयोगापर्यंत न जाताही सुरू ठेवू शकतात. उदा. सर्व प्रकारच्या मान्यता आणि परवानग्या प्राप्त झालेली आणि प्रत्यक्ष सुरू असलेली कामे किंवा लाभार्थींची नावे आचारसंहितेच्या आधीच जाहीर झालेले प्रकल्प, जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील निविदांचे मूल्यमापन आणि अंतिम करण्याचे काम इत्यादी. इतर निविदा जाहीर झाल्या असल्या तरी त्या अंतिम करण्यासाठी आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

दुष्काळ, पूर, पिकांवरील कीड यांसारख्या अनपेक्षित विपत्ती आणि वृद्धांसाठीच्या अथवा अपंगांसाठीच्या कल्याण योजना याबाबत मात्र आयोग मान्यता नाकारत नाही. अशा प्रकरणांमध्ये आयोगाची आगाऊ मान्यता आवश्यक असते. अशी मान्यता मिळाली तरी त्यातून सत्तारूढ पक्षाचा फायदा होईल असा प्रभाव पडू शकणारे समारंभ अपेक्षित नाहीत. ही तरतूद म्हणजे आचारसंहितेचा मानवी चेहरा आहे.

## संपादकीय »

### माना आभार !

***'तुमच्या हक्काची कमाई काँग्रेसवाले जास्त मुले असलेल्यांत वाटतील" असे पंतप्रधानांचे म्हणणे.***

काँग्रेस सत्तेवर आल्यास सर्व साधनसंपत्ती मुसलमानांकडे वळवली जाईल, अशा आशयाचे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानातील प्रचार सभेत केले. "तुमच्या हक्काची कमाई काँग्रेसवाले जास्त मुले असलेल्यांत वाटतील" असे पंतप्रधानांचे म्हणणे. मुसलमानांस जास्त अपत्ये असतात, म्हणजे काँग्रेसवाल्यांकडून विकासात 'त्यांना' अधिक प्राधान्य दिले जाईल, असे पंतप्रधान आपल्या विधानांतून सूचित करतात. हे असले विधान मुळात पंतप्रधानपदासारख्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीने करावे किंवा काय, हे असे बोलणे पंतप्रधानांस शोभते काय, या विधानांमुळे आचारसंहिता भंग होतो किंवा काय, याची चर्चा करण्याचे अजिबात प्रयोजन नाही. कारण एक तर आपला निवडणूक आयोग 'वाईट बोलू नये, वाईट पाहू नये आणि वाईट ऐकू नये' हा त्रिस्तरीय सल्ला तंतोतंत पाळतो. त्यामुळे इतक्या सर्वोच्च पदांवरील व्यक्तींच्या कथित वाईट उद्गारांची दखल त्रिसदस्यीय आयोग घेईल, याची भलती आशा फक्त मूर्खच बाळगू शकतात.

आज भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वात वेगाने व उच्च दराने वाढणारी आहे असे दिसते. त्यामुळे आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या अशा अर्थव्यवस्थेत सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी आणि उर्वरित गरजू समाज घटकांना पेन्शन देण्याची क्षमता नाही, असे म्हणणे आर्थिक तर्काला न पटणारे आहे.

# सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष!

सध्या देशात सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने पेन्शनच्या रूपात तीन प्रकार विचाराधीन व अमलात आहेत. १. केंद्र व राज्य सरकारी नोकऱ्यांमधील पेन्शन योजना; २. निमसरकारी (महामंडळे इत्यादी) कर्मचाऱ्यांसाठीची कर्मचारी पेन्शन योजना (ईपीएस-९५); ३. सामाजिक पेन्शन योजना.

निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्च न्यायालयाने नुकताच दिलेला निकाल शासनाने मान्य केला नाही. त्या कर्मचाऱ्यांना ४०० ते १००० रुपये दरमहा पेन्शन मिळते. त्यांची मागणी आहे की, नऊ हजार रुपये व त्यावर महागाई भत्ता असे पेन्शन त्यांना मिळावे. सध्या प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारी नोकरीत नियमित असलेल्या कर्मचाऱ्यांबद्दल जुनी पेन्शन योजना व नव्या पेन्शन योजनेच्या स्वरूपात सुचविलेले पर्याय चर्चेत आहेत. जुन्या पेन्शन योजनेत समाधानकारक फायदे, कर्मचाऱ्याचे अंशदान नसणे व फॅमिली पेन्शन असणे या विशेष बाबी आहेत.



नवीन (एनपीएस) पेन्शन योजनेमध्ये कर्मचाऱ्यांकडून अंशदान, नोकरीची किमान वर्षे पूर्ण झाल्याशिवाय पेन्शन सुरू न करणे, पेन्शन रकमेवर महागाई भत्ता न देणे, महागाईचे समायोजन करून वेतन आयोगाचे लाभ न देणे अशा विविध बाबी समाविष्ट आहेत. त्यामुळे श्रमिक वर्गामध्ये प्रचंड प्रमाणात चिंता, अनिश्चितता व निराशा दिसून येत आहे. त्यातून श्रमिक संघटनांची आंदोलने सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाने जुनी पेन्शन योजना मान्य करताना, पेन्शन हे प्रलंबित वेतन असून तो कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे आणि समाजातील कर्मचारी वर्गाच्या वार्धक्याची काळजी घेणारी योजना आहे, असे म्हटले. अर्थात ते म्हणत असताना त्यांनी केंद्रीय कर्मचारी, राज्य कर्मचारी असा कुठलाही भेद केलेला नाही. मात्र सध्या ज्या चर्चा चालू आहेत, त्यामध्ये बरेचसे अभ्यासक केंद्र व राज्य, असा भेद करीत आहेत. केंद्र सरकारचे उत्पन्न अधिक असल्यामुळे त्यांच्यावर पेन्शनचा ताण पडत नाही. मात्र राज्य सरकारांचे उत्पन्न कमी आहे व त्यामुळे राज्य सरकारांवर आर्थिक बोजा वाढतो आहे व तो कमी झाला पाहिजे असे अनेक अभ्यास प्रकाशित झाले आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेतील रचित सोळंकी, सोमनाथ शर्मा, आर. के. सिन्हा, समीर रंजन बेहेरा आणि अत्रि मुखर्जी यांनी रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मायकेल देबब्रत पात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली 'फिस्कल कॉस्ट ऑफ रिव्हर्टिंग टू दि ओल्ड पेन्शन स्कीम बाय दि इंडियन स्टेट्स: ऑन असेसमेंट' ('जुन्या पेन्शन योजनेकडे परत गेल्यास राज्य सरकारांवरील वित्तीय भार: एक मूल्यांकन') हा अभ्यास रिझर्व्ह बँक बुलेटिनच्या सप्टेंबर २०२३ च्या अंकात प्रकाशित केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आमच्याकडेही बोलण्यासारखं खूप आहे!

## मनसे आमदार राजू पाटलांचा ठाकरे गटाला सूचक इशारा!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आमदार राजू पाटील यांनी ठाकरे गटाला सूचक इशारा दिला आहे. ‘ एक भाऊ लढत असताना दुसरा भाऊ पाठिंबा देत नाही, असा नरेटिव्ह सेट केला जातोय. नरेटिव्ह सेट करून लोकांसमोर जाऊ नका आमच्याकडे बोलण्यासारखं खूप आहे असा इशारा मनसे आमदार राजू पाटील यांनी ठाकरे गटाच्या नेत्यांना दिला आहे.**



पुढे बोलताना राजू पाटील यांनी ‘एक भाऊ लढत असताना दुसरा भाऊ पाठिंबा देत नाही असा नरेटिव्ह सेट केला जातोय . परंतु असं काही नाही ,आजतागायत इतक्या राजकीय घटना घडल्या, उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना फोन केलाय का? घराच्या शेजारी शपथविधी होता त्यावेळेला सांगितलं नाही. तुम्ही तुमचं राजकारण करा मात्र नरेटिव्ह सेट करून लोकांसमोर जाऊ नका. आमच्याकडे बोलण्यासारखं खूप आहे.’ ‘त्यामुळे राज ठाकरेंनी घेतलेल्या अनेक निर्णयपैकी हा एक निर्णय आहे. जेव्हा जेव्हा देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदेंना विचारलं, राज्यसभा असेल विधानसभा असेल अशा वेळेस आम्ही पाठिंबा दिलाय त्यामुळे असं नाही की आत्ता बिनशर्त पाठिंबा दिलाय.’ असंही राजू पाटील म्हणाले. याशिवाय मुख्यमंत्री शिंदे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना मनसे आमदार राजू पाटील यांनी सांगितलं की, ‘ही लोकसभा निवडणूक वाघाची डीएनए टेस्ट आहे. आता लवकरच कळेल कोण नकली कोण असली, त्यामुळे मी काही बोलू शकत नाही.’ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कल्याण-डोंबिवलीत ‘काही नकली वाघ येऊन गेले पोकळ डरकाळी फोडून गेले पण जोपर्यंत एकनाथ शिंदे रिंग मास्टर आहे, तोपर्यंत वाघाचा कातडं पांघरणाऱ्या शेळ्या कधीही वाघ होणार नाहीत.’ असा टोला नाव न घेता उद्धव ठाकरेंना लगावला होता. याबाबत मनसे आमदार राजू पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.

### श्रीकांत शिंदे यंदा हटट्रिक करतील


» यावेळी बोलताना मनसे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होणार, श्रीकांत शिंदे यंदा हटट्रिक करतील मोठ्या बहुमताने निवडून येतील. 26 एप्रिलनंतर प्रचाराला वेग येणार आहे, त्या अनुषंगाने येत्या 26 तारखेच्या आधी अविनाश जाधव आणि मी मेळावे घेणार आहोत. कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांना तिकडे आमंत्रित करणार आहोत असे सांगितले .

# .. तर महिला ठरतील ‘गेम चेंजर’!

## यंदा 33 कोटी महिला मतदान करण्याची शक्यता

।मुंबई। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील मतदान नुकतेच झाले. यंदा मतदानासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात नाव नोंदणी केलेली आहे, मात्र नोंदणी करूनही मतदान न केलेल्या माहिलांची संख्या मोठी आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने गेल्या काही निवडणुकांमधील महिला मतदारांबाबतचे संशोधन नुकतेच प्रसिद्ध केले आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार, नाव नोंदवूनही मतदान केंद्रावर न पोहोचणाऱ्या महिलांची संख्या महाराष्ट्रासह बिहार, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि राजस्थानात अधिक आहे.**



- » योजना - महिला लाभार्थी
- » स्टँड अप इंडिया- ८१ टक्के
- » मुद्रा कर्ज - ६८ टक्के
- » पंतप्रधान सुरक्षा विमा योजना- ३७ टक्के
- » पंतप्रधान जनधन योजना - २७ टक्के

या अहवालात नोंदवलेल्या अंदाजानुसार मतदानासाठी बाहेर पडणाऱ्या महिलांचा टक्का वाढवणे शक्य आहे. यंदाच्या निवडणुकीत ३३ कोटी महिला मतदान करतील, असा अंदाज आहे. प्रयत्न केले तर देशभरात आणखी १३ कोटी महिला मतदान करू शकतात. असे घडले तर २०२४ आणि पुढील सर्व निवडणुकांमध्ये महिला ‘गेम चेंजर’ ठरू शकतात, असा दावा अहवालात करण्यात आला आहे.

गेल्या पाच वर्षांत ज्या २३ राज्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या, तिथे महिलांचा सहभाग पुरुषांपेक्षा १८ राज्यांमध्ये अधिक होता. विशेष म्हणजे, त्यापैकी १० राज्यांत पूर्वीचेच सरकार सत्तेत आले. केरळ, गोवा, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, छत्तीसगड या राज्यांमधील निवडणुकांत महिलांचे मत निर्णायक ठरले, तर तेलंगण, हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि सिक्कीममध्ये यंदाच्या निवडणुकीत महिलांचा मतटक्का निर्णायक ठरेल, असे भाकीतही अहवालात नोंदवण्यात आले आहे.

### योजनांचा हात

शिक्षणात वाढ, राजकीय सजगता, आर्थिक उन्नती आणि निर्णय प्रक्रियेत वाढ यांसह महिलांसाठीच्या विशेष योजनांचा महत्त्वाचा वाटा महिलांच्या राजकीय सहभागामागे आहे, असे हा अहवाल सांगतो. गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, तेलंगण या राज्यांत जनधन खात्यांत वाढ झाली, त्याच राज्यांत महिलांचा निवडणुकीतील सहभागही वाढला. एका परीने हे मोफत योजनांना दिलेले उत्तरच आहे. महिलांना शाश्वत विकास आणि सामाजिक सुरक्षा हव्या असल्याचे यातून दिसते. निवडणूक आयोग मतदारांच्या दारी; परभणीत १६२५ दिव्यांग अन् वयोवृद्धांकडे जाऊन घेतलं मतदान

### महिला प्रतिनिधींची संख्या मात्र कमीच

» संसद तसेच राज्यांच्या विधिमंडळांमध्ये महिला प्रतिनिधींचा सहभाग कमी आहे. पहिल्या लोकसभेत असलेली महिला प्रतिनिधींची पाच टक्के संख्या वाढून १७ व्या लोकसभेत ती केवळ १५ टक्क्यांवर पोहोचली आहे, तर विधानसभांमध्ये हा टक्का नऊपर्यंत गेला आहे. केंद्र आणि राज्यांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारी १०६ वी घटनादुरुस्ती जनगणनेनंतर प्रत्यक्ष लागू होईल तेव्हा हे प्रतिनिधित्व अर्थातच वाढेल.

# रायगड मतदारसंघातून १३ उमेदवार निवडणूक रिंगणात, अनंत गीतेंचा समावेश

। अलिबाग । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

रायगड लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी आठ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्र मागे घेतली. त्यामुळे १३ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहीले आहेत. यात तीन अनंत गीते नामक उमेदवारांचा समावेश आहे. रायगड लोकसभा मतदार संघासाठी २८ उमेदवारांची ४० नामनिर्देशन पत्र दाखल झाली होती. यापैकी छाननी दरम्यान सात उमेदवारांचे अवैध ठरले. त्यामुळे २१ उमेदवारांची २८ नामनिर्देशनपत्र शिल्लक राहीली होती. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी आठ जणांनी आपली नामनिर्देशन पत्र मागे घेतली. त्यामुळे अंतिमतः १३ उमेदवार निवडणूक रिंगणात राहीले आहेत.

सोमवारी आस्वाद जयदास पाटील- शेकाप, सुनील दत्ताराम तटकरी, अभिजीत अजित कडवे, नंदकुमार गोपाळ रघुवीर, मिलिंद काशिनाथ कांबळे, विजय गोपाळ बना, गोपाळ यशवंतराव तंतरपाळे, अस्मिता अश्विन उंदीरे यांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे अनंत गिते(अपक्ष) अनंत बाळोजी गिते(अपक्ष) अनंत गंगाराम गिते(शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे), नितीन जगन्नाथ मयेकर (अपक्ष), मंगेश पद्माकर कोळी(अपक्ष) प्रकाश बाळकृष्ण चव्हाण (भारतीय जवान किसान पार्टी) पांडूरंग दामोदर चौले (अपक्ष), सुनील दत्तात्रेय तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), श्रीनिवास सत्यनारायण मट्टरपती(अपक्ष), अजय यशवंत उपाध्ये(अपक्ष), अंजली अश्विन केळकर (अपक्ष), अमित श्रीपाल कडवे(अपक्ष), कुमूदिनी रविंद्र चव्हाण (वंचित बहुजन आघाडी) असे तेरा उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहीले आहेत.

यात तीन अनंत गीते नामक उमेदवारांचा समावेश आहे. गीते यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या दोन उमेदवारांनी आपले अर्ज कायम ठेवले असले तरी, सुनील तटकरे यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या एका उमेदवारानी आज निवडणुकीतून माघार घेतली आहे.

# मोदीविरोधात काँग्रेस आक्रमक!

## मुस्लिमांना संपत्तीचे फेरवाटप करण्याच्या आरोपावरून संतप्त प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रात काँग्रेसची सत्ता आली तर जास्त मुले असलेल्या 'घुसखोरां'ना संपत्तीचे फेरवाटप केले जाईल. महिलांची मंगळसूत्रे हिसकावून घेतली जातील, या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विधानांमुळे सोमवारी आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. या आक्षेपार्ह विधानावरून काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यामध्ये हिंदू वा मुस्लीम हे शब्ददेखील नसल्याचे सांगत लोकांमध्ये भीती पसरवण्याचा योजनाबद्ध प्रयत्न मोदी व भाजप करत असल्याची टीका पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी केली.**



राजस्थानातील बंसवारा येथील प्रचारसभेत रविवारी मोदींनी घणाघाती आरोप केले. संपत्तीचे फेरवाटप करण्याचे आश्वासन काँग्रेसच्या जाहीरनाम्यात देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००६ मधील राष्ट्रीय विकास परिषदेतील भाषणाचा आधार घेत काँग्रेसवर मुस्लीम अनुनयाची आरोप मोदी यांनी केला. त्यानंतर सोमवारी काँग्रेसने पंतप्रधान व भाजपवर चौफेर हल्ला चढविला. लोकसभा निवडणुकीत धर्माच्या आधारे दुही निर्माण करण्याचा प्रयत्न मोदींनी केला असून त्यांच्याविरोधात त्वरित कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली. याप्रकरणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने सोमवारी आयोगाची भेट घेऊन अधिकृत तक्रार नोंदवली. या वादावर आयोगाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. काँग्रेसने भाजपविरोधात आतापर्यंत १७ तक्रारी केल्या आहेत.

### भाजपचा ध्रुवीकरणावर भर?

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी २६ एप्रिल रोजी होणार असून त्यापूर्वी भाजप व काँग्रेस यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपांचे तुंबळ युद्ध सुरू झाले आहे. यावेळी रविवारच्या राजस्थानमधील प्रचारसभेत पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिंदू-मुस्लीम मुद्दा ऐरणीवर आणला.

### जाहीरनाम्यात 'संपत्तीचे फेरवाटप' नाही!

काँग्रेसच्या ४५ पानांच्या जाहीरनाम्यामध्ये 'संपत्तीच्या फेरवाटपा'चा उल्लेख नाही. पान क्रमांक-६ वर 'सामाजिक न्याय' या विभागात जातनिहाय जनगणना केल्यानंतर विकासामध्ये अनुसूचित जाती-जमाती, ओबीसींच्या विकासासाठी रचनात्मक (ॲफरमेटिव्ह) प्रयत्न केला जाईल. आरक्षणाची ५० टक्के मर्यादा काढून टाकली जाईल. यासह ७ व्या क्रमांकावर 'सरकारी जमीन व अतिरिक्त जमिनीचे गरिबांना वाटप केले जाईल', असा उल्लेख करण्यात आला आहे.

### मनमोहन सिंग नेमके काय म्हणाले होते?

* अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, अल्पसंख्याक, महिला व मुले यांच्या उन्नतीसाठी कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. अनुसूचित जाती-जमातींच्या कल्याणासाठी योजना राबवाव्या लागतील.
* अल्पसंख्याक, विशेषत: मुस्लीम अल्पसंख्याकांपर्यंत विकासाची फळे न्याय्यरीतीने पोहोचली पाहिजेत. देशातील संसाधनांवर त्यांचा पहिला हक्क असायला हवा!..
* २००६ मध्ये मनमोहन सिंग यांच्या या भाषणावरून वाद झाला होता. त्यानंतर संसाधनांवरील हक्क मुस्लीम नव्हे तर अनुसूचित जाती-जमाती व ओबीसींचा असल्याचे स्पष्टीकरण त्यांच्या कार्यालयाने दिले होते.

### मोदींचे विधान असत्य – डॉ. मुणगेकर

» देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे, असे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी कधीच म्हटलेले नाही. डॉ. सिंग यांचा हवाला देत पंतप्रधानांनी केलेले विधान असत्य आहे, असा दावा काँग्रेस नेते डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. मोदी चुकीची माहिती पसरवत आहेत. मुस्लीम समाजाविरोधात देशातील जनतेमध्ये असंतोष निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजण्याचा डाव असल्याचाही त्यांचा आरोप आहे.

### मोदी नेमके काय म्हणाले?

» काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील गोष्टी अत्यंत गंभीर आहेत. काँग्रेसचे सरकार आल्यास प्रत्येकाच्या मालमत्तेचे सर्वेक्षण केले जाईल, माता-भगिनींच्या सोन्याचे मोजमाप केले जाईल आणि नंतर त्याचे फेरवाटप केले जाईल, असे काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेस तुमचे मंगळसूत्रही सोडणार नाही. काँग्रेस आता शहरी नक्षलींच्या पूर्णपणे ताब्यात गेला आहे.


# नेते गेले तरी कार्यकर्ते काँग्रेसबरोबरच!

## काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडून सत्ताबदलाचा विश्वास

। नवी दिल्ली ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसचे नेते पक्षाला सोडून जात असले तरी तळागाळातील कार्यकर्ते पक्षाबरोबरच आहेत. जोपर्यंत बुथस्तरीय किंवा ब्लॉकस्तरीय कार्यकर्ते आमच्याबरोबर आहेत तोपर्यंत आम्हाला चिंता करण्याचे कारण नाही, असा विश्वास काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 'इंडियन एक्स्प्रेस'च्या 'आयडिया एक्स्चेंज' कार्यक्रमात विविध प्रश्नांची उत्तरे देताना व्यक्त केला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रालोआला ४०० जागा मिळतील तर राहुल गांधी भाजपला १५०पेक्षा जास्त जागा मिळणार नाहीत असे म्हणतात, त्याबद्दल विचारले असता खरगे यांनी देशात सत्ताबदल होईल असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, "मोदी बोलतात त्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवणे कठीण आहे. त्यांचे हे स्वप्न पूर्ण होणार नाही. त्यांना रोखण्यासाठी आम्ही आवश्यक संख्याबळ जमा करत आहोत. आम्ही भाजपला दाखवून देऊ की, विरोधकांना नाही तर जनतेला बदल हवा आहे. 'इंडिया' आघाडी मजबूत संख्याबळासह पुन्हा येईल आणि त्यांचा पराभव करेल." पंतप्रधान मोदी यांना पराभवाची भीती भेडसावत असल्याचा दावा खरगे यांनी केला. हिंदी पट्ट्यामधील काँग्रेसच्या स्थितीबद्दल विचारले असता, खरगे यांनी उत्तर प्रदेश, बिहारचा काही भाग आणि उत्तराखंड यासारख्या काही ठिकाणी पक्षाची स्थिती चांगली नसल्याचे मान्य केले. मात्र, अन्य राज्यांमध्ये पक्ष मजबूत असून उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष (सप) आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद) यांच्याबरोबर केलेल्या आघाडीचा फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला.

पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि आसाम तसेच ओडिशामध्ये काँग्रेसची कामगिरी चांगली होईल असे ते म्हणाले.

काँग्रेस पक्ष राज्यघटना आणि लोकशाहीबद्दल बोलतो पण लोकांचे मुद्दे उपस्थित करत नाही अशी टीका होते, या प्रश्नाचे उत्तर देताना खरगे यांनी महागाईविरोधात पक्षाने सर्व राज्यांमध्ये निदर्शने केल्याचे सांगितले. या निवडणुकीत काँग्रेस ३००पेक्षा कमी जागांवर निवडणूक लढवत आहे. यामुळे राष्ट्रव्यापी पक्ष म्हणून दावा सोडून दिला आहे का असे विचारल्यावर खरगे यांनी सांगितले की, "काँग्रेस पक्ष ३५०पेक्षा जास्त जागांवर निवडणूक लढवत आहे. तसेच २८० जागांवर उमेदवार घोषित केले आहेत.

### मोदीजी केवळ गांधी कुटुंबांसाठी अपशब्द वापरतात

» १० मिनिटांसाठी मी स्टुडिओत जाऊन बातम्या वाचणार असेन, अथवा अर्ध्या तासासाठी, मी कधीच पाणी घेऊन जात नाही. त्या दिवशी मी स्टुडिओमधील व्यवस्थापकाला इशारा करून पाणी आणून देण्यास सांगितलं. लोपामुद्रा सिन्हा म्हणाल्या, माझ्या डोळ्यासमोर अंधारी येत होती तेव्हा मी पाहिलं की, चार बातम्या बाकी आहेत. मला वाटलं या चार बातम्या मी पूर्ण करू शकेन. त्यातल्या दोन बातम्या मी कशाबशा वाचल्या. त्यानंतर तिसरी बातमी उष्माघाताशी संबंधित होती. ती बातमी वाचताना मला हळूहळू भोवळ येऊ लागली. त्यावेळी मी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला. मी ही बातमीदेखील पूर्ण करेन असं मला वाटलेलं. तेवढ्यात मला दिसणं बंद झालं. माझ्या डोळ्यांसमोर काळाकुट्ट अंधार होता. मला टेलिप्रॉम्प्टर दिसतच नव्हता. माझ्यासमोरचं दृष्य हळूहळू पुसट होत गेलं. सुरुवातीला वाटलेलं की, टेलिप्रॉम्प्टर धिम्या गतीने चालतोय. मात्र मलाच दिसेनासं झालं होतं.

# तू है मेरी किरण! गौरव मोरे जुही चावलाला इम्प्रेस करण्याचा प्रयत्न करणार!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमामुळे अभिनेता गौरव मोरे घराघरांत लोकप्रिय झाला. अभिनेत्याचे चाहते त्याला फिल्टरपाड्याचा बच्चन म्हणून देखील ओळखतात. विनोदाचं अचूक टायमिंग साधत गौरवने महाराष्ट्रातील सगळ्याच प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. परंतु, गेल्या काही दिवसांपासून गौरवच्या कॉमेडीवर हिंदी प्रेक्षकही खळखळून हसत आहेत. नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमधून याची प्रचिती मिळते.

गौरवने काही दिवसांपूर्वीच 'मॅडनेस मचाएंगे' या हिंदी कार्यक्रमात एन्ट्री घेतली. पहिल्याच भागात गौरवने जबरदस्त परफॉर्मन्स दिला होता. आता येत्या भागात हा मराठमोळा अभिनेता चक्क जुही चावला हिला इम्प्रेस करण्याचा प्रयत्न करणार आहे.

जुही चावला आणि शाहरुख खान यांच्या आयकॉनिक 'डर' चित्रपटातील किंग खानचं पात्र गौरव रिक्रिएट करणार आहे. 'तू है मेरी किरण!' हे गाणं गात गौरव शाहरुखची हुबेहूब नक्कल करत असल्याचं पाहायला मिळत आहे. यावेळी अभिनेता जुहीला



गुडघ्यावर बसून गुलाब देतो, गुलाबाच्या पाकळ्यांची तिच्यावर उधळण करतो. हे सगळं पाहून अभिनेत्री सुद्धा आनंदी होते. पुढे, या स्किटमध्ये सुगंधाची एन्ट्री होती. गौरव आणि सुगंधाच्या जुगलबंदीवर जुही खळखळून हसत असल्याचं नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. हा एपिसोड येत्या शनिवार-रविवारी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

दरम्यान, गौरवने शेअर केलेल्या व्हिडीओवर त्याच्या चाहत्यांनी असंख्य कमेंट्स केल्या आहेत. "तिकडे पण आग लावणार गौरव सर", "गौरव तुझा अभिमान वाटतोय", "थेट जुही चावला वाह" अशा प्रतिक्रिया देत गौरवच्या चाहत्यांनी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## "यापुढे मी महाराजांची भूमिका करणार नाही", :चिन्मय मांडलेकर



मराठी सिनेसृष्टीतील हरहुन्नरी कलाकार चिन्मय मांडलेकर अभिनेत्यासह लेखक, दिग्दर्शक व निर्मात्याचीही धुरा सांभाळतो. मराठी चित्रपटांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारण्यापासून ते 'द काश्मीर फाईल्स'मध्ये फारुख मल्लिक बिट्टा या खलनायकाची भूमिका साकारण्यापर्यंत चिन्मयने आपल्या अभिनयाद्वारे वेळोवेळी स्वत:ला सिद्ध केलं आहे. याच अभिनेत्याला आता त्याच्या मुलाच्या नावावरून ट्रोल केलं जातंय. या ट्रोलिंगबद्दल त्याची पत्नी नेहा जोशी-मांडलेकर हिनं काल सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला होता. त्यानंतरही या कुटुंबावर ट्रोलिंगचा मारा सुरूच राहिला. आता अभिनेत्यानं यावर आपलं मत स्पष्टच मांडलं आहे.

चिन्मयने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर व्हिडीओ शेअर करत मुलाचं नाव 'जहांगीर' ठेवल्यामुळे होणाऱ्या ट्रोलिंगवर भाष्य केलं आहे.



## रणवीर सिंगची पोलिसांत धाव!; दाखल केली तक्रार!

'इंडिया टुडे' च्या वृत्तानुसार, डीपफेक व्हिडीओ व्हायरल झाल्यावर रणवीर सिंगने मुंबई पोलिसांच्या सायबर क्राइम सेलकडे तक्रार दाखल केली आहे. अभिनेत्याच्या एआयने बनवलेल्या डीपफेक व्हिडीओत तो राजकीय पक्षाचं समर्थन करताना दिसतोय. त्याचा हा व्हिडीओ वाराणसी दौऱ्यासाठी त्याने शूट केलेल्या व्हिडीओपासून तयार करण्यात आला होता. तक्रार दाखल करण्याआधी रणवीरने सोशल मीडियावर पोस्ट करत 'डीपफेकपासून सावध राहा, मित्रांनो' असं लिहिलं होतं. त्यानंतर आता अभिनेत्याने त्याच्या व्हायरल व्हिडीओसंदर्भात तक्रार दाखल केली आहे.

रणवीर सिंगच्या प्रवक्त्याने तक्रारीची पुष्टी केली आहे. अभिनेत्याने पोलीस तक्रार दाखल केली आहे आणि सायबर क्राइम सेलकडून पुढील तपासासाठी एफआयआर दाखल करण्यात आला आहे, असं प्रवक्त्याने सांगितलं. "होय, आम्ही पोलीस तक्रार दाखल केली आहे आणि एआयच्या मदतीने तयार केलेला रणवीर सिंगचा डीपफेक व्हिडीओ शेअर करणाऱ्या हँडलविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे," असं प्रवक्ता म्हणाला.

रणवीरआधी आमिर खानचाही डीपफेक व्हिडीओ व्हायरल झाला होता, ज्यात तो राजकीय पक्षाचा प्रचार करताना दिसत होता. हा व्हिडीओ बनावट असल्याचं स्पष्टीकरण अभिनेत्याने दिलं होतं व मुंबई पोलिसांच्या सायबर क्राइम सेलकडे तक्रारही केली होती. त्याचा हा व्हिडीओ 'सत्यमेव जयते' च्या एका एपिसोडमधून एडिट करून तयार करण्यात आला होता.

## अमिताभ बच्चन यांनी अलिबागमध्ये खरेदी केली कोट्यवधींची प्रॉपर्टी



मुंबई- बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन कायम प्रेक्षकांमध्ये चर्चेत असतात. या वयातही ते चित्रपटात काम करताना दिसतात. त्यांचा उत्साह अगदी तरुणांनाही लाजवेल असा असतो. नुकताच त्यांच्या 'कल्की २८९८ AD' या चित्रपटाचा पोस्टर प्रदर्शित झाला आहे. यातील त्यांच्या लूकची सोशल मीडियावर प्रचंड चर्चा आहे. त्यांच्या या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र त्यासोबतच आणखी एका गोष्टीमुळे अमिताभ सध्या चाहत्यांमध्ये चर्चेत आहेत. अमिताभ यांनी नुकतीच अलिबाग येथे नवीन जागा खरेदी केली आहे. महाराष्ट्रातील मुंबईच्या शेजारी असणाऱ्या अलिबाग येथे त्यांनी कोट्यवधींची जागा खरेदी केली आहे. अमिताभ यांनी 'द हाउस ऑफ अभिनंदन लोढ़ा' यांच्याकडून १० हजार स्क्वेअर फूट एवढी जागा खरेदी केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार हा प्रोजेक्ट मागील वर्षी एप्रिल महिन्यात लॉन्च करण्यात आला होता.एचटी डिजिटलने दिलेल्या माहितीनुसार, जागेची सगळी प्रक्रिया आणि रजिस्ट्रेशन मागील आठवड्यात पूर्ण करण्यात आलं.

## जॅकी श्रॉफनी करुन दिली ओळख, किशोरी शहाणेंनीच घातली लग्नाची मागणी!

मुंबई- मराठीची एकेकाळची सुपरस्टार म्हणून अभिनेत्री किशोरी शहाणे यांना ओळखले जाते. गेली तीन दशके त्या प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपल्या सौंदर्य आणि अभिनयाच्या जोरावर त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ निर्माण केले. आज किशोरी यांचा ५५ वा वाढदिवस आहे.

अभिनेत्री किशोरी शहाणे यांनी वयाच्या १७ व्या वर्षी मनोरंजन क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी अशोक सराफ, महेश कोठारे, लक्ष्मीकांत बेर्डे आणि सचिन पिळगावकर यांसारख्या दिग्गजांसोबत काम करून सिने पडदा गाजवला.

किशोरी शहाणे यांनी हिंदीतील प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक दीपक बलराज यांच्याशी लग्न केले आहे. बिग बॉस मध्ये असताना किशोरी यांनी त्यांच्या लव स्टोरी बद्दल आरोह वेलणकरशी चर्चा केली होती. त्यांनी सांगितले की, बॉलीवूड अभिनेता जॅकी श्रॉफ यांच्यामुळे दीपक यांच्याशी ओळख झालेली. अंधेरी महाकाली येथील होली स्पिरिट हॉस्पिटल येथे त्यांची जॅकी श्रॉफशी ओळख झालेली.



त्यानंतर जॅकीनेच माझी ओळख दीपकला करून दिलेली. तुमच्या पहिल्या भेटीतच दीपक ने हप्ता बंद या सिनेमाची भूमिका मला दिली. सेटवर आमची मैत्री वाढत गेली आणि नंतर त्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. एक दिवस मीच त्यांना हसत हसत विचारलं आपण लग्न करायचं का ? तर त्यांनीही हसत हसत होकार दिला. पण हळूहळू आमच्या नात्याची शंका माझ्या घरी येऊ लागली त्यामुळे मला घरी खरं सांगणं भाग पडलं. पण नंतर घरच्यांनीही आमच्या नात्याला परवानगी दिली आणि आमचं लग्न लावून दिलं. किशोरी आणि दीपक बलराज यांना आता एक मुलगा आहे.

अभिनेत्रीच्या कामाबद्दल बोलायचे झालास त्या शेवटच्या स्टार प्लस वरील गुम है किसी के प्यार में या मालिकेत भवानी काकूच्या भूमिकेत दिसलेल्या. त्याशिवाय त्यांनी आधी बिग बॉस मराठी २ मध्येही सहभाग घेतलेला. मराठीत त्यांचे अनेक सिनेमे आजही सुपरहिट आहेत. त्यात बाळाचे बाप ब्रम्हचारी, माझा पती करोडपती, नारबाची वाडी, एकुलती एक, वाजवा रे वाजवा, प्रेम करुया खुल्लम खुल्ला यांसारख्या अनेक सुपरहिट सिनेमांचा समावेश आहे.

# गुकेशला ऐतिहासिक जेतेपद!

## नामांकितांना मागे सोडत 'कँडिडेट्स'मध्ये अजिंक्य; जगज्जेतेपदाच्या लढतीसाठी पात्र

टोरंटो । वृत्तसंस्था

**भारताचा १७ वर्षीय ग्रँडमास्टर डी. गुकेशने आपला आदर्श आणि पाच वेळा विश्वविजेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदच्या पावलावर पाऊल ठेवताना प्रतिष्ठेची 'कँडिडेट्स' स्पर्धा जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. 'कँडिडेट्स'चे जेतेपद मिळवणारा तो आजवरचा सर्वात युवा बुद्धिबळपटू ठरला आहे. त्याने महान गॅरी कास्पारोवने ४० वर्षांपूर्वी रचलेला विक्रम मोडीत काढला.**



तो 'कँडिडेट्स' जिंकणारा आनंदनंतरचा दुसराच भारतीय बुद्धिबळपटू ठरला. या जेतेपदासह चेन्नईकर गुकेशने विद्यमान जगज्जेत्या चीनच्या डिंग लिरेनला या वर्षीच होणाऱ्या जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीत आव्हान देण्याची संधी मिळवली.

विदितचा नाकामुराला धक्का; गुकेशचा प्रज्ञानंदवर विजय; हम्पीची सलग दुसरी बरोबरी

यंदाची 'कँडिडेट्स' स्पर्धा बुद्धिबळप्रेमींच्या कायम लक्षात राहील अशी झाली. १३व्या फेरीअंती गुकेश अग्रस्थानी होता. मात्र, त्याच्यात आणि संयुक्तरीत्या दुसऱ्या स्थानावर असलेल्या इयान नेपोम्नियाशी, हिकारू नाकामुरा आणि फॅबियानो कारुआना यांच्यात केवळ अर्ध्या गुणाचा फरक होता. जेतेपदाच्या शर्यतीत असलेले हे चौघे १४व्या फेरीत एकमेकांविरुद्धच खेळणार असल्याने ही अखेरची फेरी अत्यंत चुरशीची व नाटयमय होणार असे अपेक्षित होते आणि तेच झाले. गुकेशने अमेरिकेच्या नाकामुराला ७१ चालींत बरोबरीत रोखण्यात यश मिळवले. मात्र, त्यानंतरही जवळपास तासभर त्याचे जेतेपद निश्चित झाले नव्हते. अखेर गेल्या दोन 'कँडिडेट्स'मधील विजेता नेपोम्नियाशी आणि अमेरिकेचा अग्रमानांकित कारुआना यांच्यातील लढत तब्बल १०९ चालींनंतर बरोबरीत सुटल्याने गुकेशच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब झाले.

१४ फेऱ्यांअंती गुकेशच्या खात्यावर नऊ गुण होते. नेपोम्नियाशी, नाकामुरा आणि कारुआना यांनी प्रत्येकी ८.५ गुणांसह संयुक्तरीत्या दुसरे स्थान मिळवले. भारताचा आर. प्रज्ञानंद ७ गुणांसह पाचव्या, विदित गुजराथी सहा गुणांसह सहाव्या, फ्रान्सचा अलिरेझा फिरुझा पाच गुणांसह सातव्या, तर अझरबैजानचा निजात अबासोव ३.५ गुणांसह आठव्या स्थानी राहिला. अखेरच्या फेरीत प्रज्ञानंदने अबासोवला पराभूत केले, तर विदित आणि फिरुझा यांच्यातील लढत बरोबरीत सुटली.

### भारतीयांची स्पर्धेतील कामगिरी

**डी. गुकेश :** भारताच्या डी. गुकेशने 'कँडिडेट्स'मधील सर्वात युवा विजेता म्हणून मिरवण्याचा मान मिळवला आहे. गुकेशने या स्पर्धेत पाच विजय मिळवले, तर आठ लढती बरोबरीत सोडवल्या. त्याला केवळ अलिरेझा फिरुझाकडून पराभव पत्करावा लागला.

**प्रज्ञानंद :** गुकेशचा खास मित्र असलेल्या युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदनेही 'कँडिडेट्स'मध्ये आपल्यातील अलौकिक प्रतिभा सिद्ध केली. त्याने सात गुणांसह पाचवे स्थान मिळवले. त्याने या स्पर्धेदरम्यान विदित गुजराथी आणि निजात अबासोव (दोन वेळा) यांना पराभूत केले. विशेष म्हणजे त्याने कोणत्याही लढतीत धोका पत्करणे टाळले नाही. त्यामुळे त्याचे बरेच कौतुक झाले.

### महिलांमध्ये टॅन विजेती, हम्पी दुसऱ्या स्थानी

'कँडिडेट्स'च्या महिला विभागातही अखेरच्या फेरीपर्यंत चुरस पाहायला मिळाली. अखेर चीनच्या टॅन झोंगीने ९ गुणांसह जेतेपद मिळवले. भारताच्या कोनेरू हम्पी आणि आर. वैशाली यांनी मिळवलेले यशही खास ठरले. १४व्या आणि अखेरच्या फेरीत हम्पीने जेतेपदाच्या शर्यतीत असलेल्या चीनच्या ले टिंगजीला पराभूत केले. यासह टिंगजीला मागे टाकत तिने गुणतालिकेत दुसरे स्थानही पटकावले. तसेच वैशालीने सलग पाचव्या विजयाची नोंद करताना रशियाच्या अनुभवी कॅटेरिना लायनोला पराभवाचा धक्का दिला. हम्पी, टिंगजी आणि वैशाली या तिघींच्याही खात्यावर ७.५ गुण होते. परंतु टायब्रेकरच्या आधारे हम्पीने दुसरे, टिंगजीने तिसरे आणि वैशालीने चौथे स्थान मिळवले.

# शतकवीर यशस्वीने मुंबई इंडियन्सला पाजले पाणी

## हार्दिकसेनेवर पुन्हा पराभवाची नामुष्की...

जयपूर। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील ३७ वा सामना पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला.महाराजा यादविंदर सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर येथे झालेल्या सामन्यात गुजरातने पंजाबचा ३ विकेट्सनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १४३ धावांचे लक्ष्य दिले होते, जे गुजरात टायटन्सने शेवटच्या षटकातील पहिल्या चेंडूवर १४७ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. गुजरातसाठी राहुल तेवतीयाने १८ चेंडूत नाबाद ३६ धावा करत विजयात सर्वाधिक धावांचे योगदान दिले.**







मुंबईकर यशस्वी जैस्वालने शतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सलाच पाणी पाजल्याचे पाहायला मिळाले. मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यामध्ये या आयपीएलमधी हा दुसरा सामना होता. या दुसऱ्या सामन्यातही राजस्थान रॉयल्सने हार्दिकसेनेला धुळ चारल्याचे पाहायला मिळाले. मुंबईचा डाव अडखळत सुरु झाला असला तरी तिलक वर्माच्या ६५ धावांच्या खेळीच्या जोरावर १७९ धावांचा डोंगर उभारता आला होता. पण हार्दिक पंड्याने गोलंदाजीत गोंधळ घातला आणि त्यामुळेच मुंबई इंडियन्सला लय सापडली नाही. पण यशस्वीने या गोष्टीचा चांगलाच फायदा उचलला आणि ६० चेंडूंत नाबाद १०४ धावांची खेळी साकारत संघाला ९ विकेट्स राखून विजय मिळवून दिला. राजस्थानचा हा या आयपीएलमधील मुंबईवरचा दुसरा विजय ठरला.

राजस्थानने पहिल्या पॉवर प्लेमध्ये बिन बाद ६१ अशी चांगली सुरुवात केली होती. सहा षटकांनंतर पावसामुळे काही वेळ वाया गेला. पावसानंतर खेळात काही बदल होतो का, याकडे मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांचे लक्ष होते. पण यशस्वी जैस्वालने मुंबईच्या विजयावर पाणी फेरल्याचे पाहायला मिळाले. यशस्वीने सुरुवातीपासून जोरदार फटकेबाजीला सुरुवात केली. पाऊस पडल्यावरही यशस्वी चांगल्या फॉर्मात असल्याचे पाहायला मिळाले. पावसानंतर जोस बटलर २५ चेंडूंत ३५ धावा करून बाद झाला. पण यशस्वी मात्र फटकेबाजी करत होता, यावेळी त्याला कर्णधार संजू सॅमसनची चांगली साथ मिळत होती. यशस्वी आणि संजू या दोघांनी मुंबईच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला आणि राजस्थानच्या विजयाच्या दिशेने मार्गक्रमण केले.

मुंबई इंडियन्सच्या डावाची सुरुवात वाईट झाली. रोहित शर्मा ६, ईशान किशन ० आणि सूर्यकुमार यादव १०, असे तीन धक्के मुंबईला फक्त २० धावांत बसले. त्यानंतर तिलक वर्माने मुंबईच्या डावाला चांगला आकार देण्याता प्रयत्न केला. तिलकने नेहाल वधेराच्या साथीने पाचव्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी रचली. वधेराने यावेळी ४९ धावांची खेळी साकारत डतिलकला चांगली साथ दिली.

### संदीप शर्माने पाच बळी मिळवले

वधेरा बाद झाल्यावर फलंदाजीला आलेल्या हार्दिकला १० चेंडूंत १० धावाच करता आल्या. पण तिलकने मात्र मुंबईच्या धावसंख्येला चांगलाच आकार दिला. तिलकने यावेळी ४५ चेंडूंत पाच चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ६५ धावांची खेळी साकारली. त्यामुळेच मुंबई इंडियन्सच्या संघाला १७९ धावा उभारता आल्या. राजस्थानकडून यावेळी संदीप शर्माने ४ षटकांत फक्त १८ धावा देत पाच बळी मिळवण्याची किमया साधली.